E-4462425

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
मंत्रालय मुंबई - ४०० ०३२

दूरध्वनी क्र.(०२२) २२०२ ६११५
फॅक्स क्र. (०२२)२२०२३९८७
ई मेल : sunil.shinde६८@nic.in

तात्काळ / कालमर्यादा

क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र. ३७/का.१४१२
दिनांक :- १५ ऑक्टोबर, २०२०.

22 OCT 2020

आस्था-2

प्रति,
अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
मंत्रालयीन विभाग (सर्व),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२

विषय : निती आयोगाच्या निती दर्पण पोर्टल वर शासनाकडून अनुदान प्राप्त होत असलेल्या स्वयंसेवी संस्थांची नोंदणी करण्याबाबत.

संदर्भ : मुख्य कार्यकारी अधिकारी, निती आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे क्र. M-11016(1)/2017-VAC, दि. २५.०९.२०२० चे अ.शा. पत्र.

महोदय,

विषयांकित प्रकरणी यासोबत जोडलेल्या संदर्भाधीन पत्राचे कृपया अवलोकन व्हावे..

२. सदर पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, निती आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी असे कळविले आहे की, निती आयोगाने निती दर्पण पोर्टल विकसित केले असून त्यावर केंद्र शासनाकडून अनुदान घेणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना नोंदणी करणे अनिवार्य आहे ज्यामुळे त्यांना विशिष्ट ओळख मिळेल. मात्र त्याप्रमाणे पूर्णपणे कार्यवाही होत नसल्याचे मा. पंतप्रधान महोदयांनी त्यांच्या दि. ०९.०१.२०१९ च्या बैठकीत निदर्शनास आणल्याचे पंतप्रधान कार्यालयाने कळविले आहे.

३. निती आयोगाच्या निती दर्पण पोर्टलच्या अनुषंगाने बहुतांश राज्य सरकारांनी नोडल अधिकारी नियुक्त केले आहेत त्यामुळे केंद्र सरकार पुरस्कृत योजना तसेच राज्य शासनाच्या योजना जिथे स्वयंसेवी संस्थांना अनुदान दिले जाते त्या योजना निती दर्पण पोर्टलवर अपलोड करण्याची विनंती करण्यात आली आहे. तसेच ज्या स्वयंसेवी संस्थांनी दर्पण पोर्टलवर अद्याप नोंदणी केली नसेल त्यांनी चार आठवड्यांच्या आत निती दर्पण पोर्टलवर नोंदणी करण्याबाबत निती आयोगाने कळविले आहे.

४. तरी निती आयोगाच्या उपरोक्त सूचनांनुसार उचित कार्यवाही करण्यासाठी संदर्भाधीन पत्राची प्रत यासोबत आपणास पाठविण्यात येत आहे.

आपला,

(ध. र. पुराडउपाध्ये)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

5539
13 NOV 2020

प्रत : सर्व उपसचिव, नियोजन विभाग

---

पृष्ठ क्र. तंशिसं/विकाना/स्वयंसेवी संस्था/2020/ 2750
दिनांक :- 18 NOV 2020

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय तंत्रनिकेतन, अनुदानित व खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था, नागपूर विभाग,
नागपूर .

आपणांस कळविण्यांत येते की, सदर प्रत्रात नमुद केल्याप्रमाणे संस्थास्तरावर कार्यवाही करण्यांत यावी .

(डॉ. राम निबुदे)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,नागपूर.